जावक क्र.मप्रनिम/सस/२०१४/७७ दिनांक ०६/६/२०१४

प्रति,
श्री श्यामसुंदर पाटील,
आयुक्त,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

विषय : कलम ३३अ, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि कलम ३१अ, हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० प्रमाणे आदेश

संदर्भ : १. माननीय प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेली दिनांक ६/२/२०१४ च्या बैठकीचे इतिवृत्त
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वरील विषयाच्या अनुषंगाने सदरहू पर्यावरण कायद्यांची पूर्तता करण्याकरिता वेळोवेळी दिलेले निर्देश.
३. मे.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल झालेली सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.१७४०/१९९८ व इतर याचिकांमधील नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम, २००० मधील तरतुदींची कालबध्दरितीने पूर्तता करण्याकरिता दिलेले २/४/२०१३ चे आदेश
४. मे.प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३०/१/२०१४ व १/२/२०१४ रोजी घेतलेल्या बैठकींचे इतिवृत

---

ज्याअर्थी, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांवर त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करुन, त्यावर योग्य ती उपाय-योजना करुन, योग्य ती प्रक्रिया करुन मगच त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे, योग्य ते संमतीपत्र जल व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियमांप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेऊन त्यातील अटी व शर्तींची पूर्तता कालबध्द रितीने करणे बंधनकारक आहे.

आणि ज्याअर्थी, पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकारमार्फत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० हे पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत प्रसारीत करण्यात आलेले आहेत. तसेच सदरहू नियमाप्रमाणे संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या नागरी घनकचऱ्याची योग्य ती वर्गवारी करुन, त्यावर मप्रनि मंडळाकडून सदरहू नियमांतर्गत घेतलेल्या अधिकार पत्राप्रमाणे त्याची व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

आणि ज्याअर्थी, जैव वैद्यकीय घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ नुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेवर, त्यांच्या कार्यक्षेत्रातील जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन उभारण्यासाठी योग्य ती उपाय-योजना करणे बंधनकारक आहे. आणि ज्याअर्थी, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ अंतर्गत आपल्या कार्यक्षेत्रातून निर्माण होणाऱ्या संपूर्ण सांडपाण्याचे संकलन व प्रक्रिया करण्याकरिता, आपण परिपूर्ण योजना बसवून आजतागायत कार्यान्वित केलेली नाही, त्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रातील बहुतांश सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता, जवळपासच्या जलक्षेत्रामध्ये सोडून मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाची हानी आपण करीत आहात. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेस खालीलप्रमाणे अंतिम सुचना देण्यात येत आहेत.

(अ) महानगरपालिकेचे सर्व सांडपाणी एकत्रित करुन, त्यावर योग्य ती परिपूर्ण प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसवून, शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.

(ब) जो नागरी घनकचरा आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होतो, त्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण (जैविक विघटनशील/अविघटनशील [Biodegradable / Non-biodegradable) आणि पुर्ननिर्माण घनकचरा (Recoverable Waste)] करुन त्यांची विल्हेवाट सांडपाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.घकव्य-१००३/प्र.क्र.६७५/पापु-२२, दिनांक २६/८/२००३ प्रमाणे योग्य ती भुभरण जागा मान्यता मिळालेल्या ठिकाणी, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० मधील तरतुदींप्रमाणे, मे.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.१७४०/१९९८ आणि इतर एकत्रित याचिका मधील दिनांक २/४/२०१३ च्या आदेशाप्रमाणे दिलेल्या विहित मुदतीत करणे आपणांवर बंधनकारक आहे.

(क) त्यामुळे, आपण परिपूर्ण सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकूण भांडवली खर्चापैकी २५% तरतुद करुन या प्रकल्पावर खर्च करावे, जेणेकरुन सदरहू यंत्रणा उभारण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद होऊन कायदेशीर पूर्तता पार पाडली जाईल.

पर्यावरण रक्षण करणे ही प्रत्येकाची घटनात्मक जबाबदारी असल्यामुळे आणि प्रत्येक नागरिकाचा मुलभूत हक्क असल्यामुळे, वरील बाबतीत त्वरीत योग्य ती अंमलबजावणी करुन आपण, स्वेच्छेने पर्यावरण संरक्षणास हातभार लावावा.

<u>सदर निर्देशपत्र आपल्या महानगरपालिकेची स्थायी समिती व सर्व साधारणसभेच्या निदर्शनास आणून देऊन त्यांच्या मंजुरीने पूर्तता अहवाल मंडळास ३० दिवसांत सादर करावा.</u>

(राजीव कुमार मित्तल)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.अध्यक्ष, मप्रनि मंडळ, मुंबई
२. मा.प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, रु.नं.२१७, विस्तार मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.प्रधान सचिव, नगर परिषद संचालनालय, महाराष्ट्र शासन, वरळी, मुंबई-३२
४. संचालक, नागरी प्रशासन विभाग (Municipal Administration Deptt), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. वरिष्ठ विधी अधिकारी/सह संचालक (हप्रनि)/ प्रधान वैज्ञानिक अधिकारी/सह संचालक (जप्रनि)/सहाय्यक सचिव (तांत्रिक)/प्रादेशिक अधिकारी(मुख्यालय)/तांत्रिक सल्लागार, मप्रनि मंडळ, मुंबई
२. प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई/नवी मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/ औरंगाबाद/पुणे/कोल्हापूर/ नाशिक/नागपूर/चंद्रपूर/अमरावती/ - त्यांनी सदरहू आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रातील उप-प्रादेशिक अधिकारी यांच्या निर्दशनास आणून, सदरहू आदेशाची पूर्तता करण्याकरिता योग्य तो पाठपुरावा करावा.

जावक क्र. मप्रनिमं/सहसंचालक(जप्रनि)/ब: दिनांक: /०९/२०१४.

प्रति,
**मा. महापौर,**
--------- महानगरपालिका,

**मा. आयुक्त,**
---------- महानगरपालिका,

**विषय :** कलम ३३ अ, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि कलम ३१ अ, हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० प्रमाणे आदेश...

**संदर्भ :**
१. मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेली दिनांक ०६/०२/२०१४ च्या बैठकीचे इतिवृत्त.
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वरील विषयाच्या अनुषंगाने सदरहू पर्यावरण कायद्यांची पूर्तता करण्याकरीता वेळोवेळी दिलेले निर्देश.
३. मे. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल झालेली सार्वजनिक हिताच्या याचिका क्र. १७४०/१९९८ व इतर याचिकांमधील नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० मधील तरतुदींची कालबध्दरीतीने पूर्तता करण्याकरीता दिलेले ०२/०४/२०१३ चे आदेश.
४. मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३०/०१/२०१४ व ०१/०२/२०१४ रोजी घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त.
५. मप्रनि मंडळाचे पत्र क्र. मप्रनिमं/सस/२०१/७१, दिनांक ०६/०६/२०१४.

**महोदय,**

उपरोक्त विषयांतर्गत संदर्भिय पत्र क्र. ५ मध्ये आपल्या महानगरपालिकेस जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांवर त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करून, त्यावर योग्य ती उपाययोजना करून, योग्य ती प्रक्रिया करून मगच त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे, योग्य ते संमतीपत्र जल व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियमांप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेऊन त्यातील अटी व शर्तीची पूर्तता कालबध्द रितीने करणे बंधनकारक आहे, असे कळविले होते.

तसेच, सदर पत्र आपल्या महानगरपालिकेच्या स्थायी समिती व सर्व साधारणसभेचया निर्दशनास आणून दयावे व त्यांच्या मंजूरीने पूर्तता अहवाल ३० दिवसांच्या आत म. प्र. नि. मंडळास सादर करावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

या संदर्भात वसई-विरार, पिंपरी चिंचवड, जळगाव व अमरावती या चार महानगरपालिकांनी म. प्र. नि. मंडळाकडे पूर्तता अहवाल सादर केलेला आहे.

मात्र सदर पत्रातील मुद्दयाची पूर्तता आपल्या महानगरपालिकेने आजतागायत केलेली नाही. या संदर्भात आपणास अंतिम संधी देण्यात आहे. तरी आपण पुढील १५ दिवसात मंडळाकडे पूर्तता अहवाल सादर करावा.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

**(राजीव कुमार मित्तल)**
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी सविनय सादर:
१. मा. अध्यक्ष, मप्रनि मंडळ, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, रूम नं. २१७, विस्तार मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, नगर परिषद संचालनालय, महाराष्ट्र शासन, वरळी, मुंबई.
४. संचालक, नागरी प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:
१. वरिष्ठ विधी अधिकारी/सहसंचालक (जप्रनि)/सहसंचालक (हप्रनि)/प्रधान वैज्ञानिक अधिकारी/सहायक सचिव (तां.)/प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय)/तांत्रिक सल्लागार, म. प्र. नि. मंडळ, मुंबई.
२. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, मुंबई/नवी मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती/चंद्रपूर - त्यांनी सदरहू आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रातील उप-प्रादेशिक अधिकारी यांच्या निर्दशनास आणून, सदरहू आदेशाची पूर्तता करण्याकरीता योग्य तो पाठपूरावा करावा.